गोदातीर समाचार दि.०२/०६/२०२२

# बिल्डर संजय बियाणी यांच्या हत्येचा अखेर छडा लागला ; ६ जणांना अटक

## खंडणीसाठीच हत्या, रिंदा गँगचा हात

## डीआयजी तांबोळी यांची पत्रकार परिषदेत माहिती






**नांदेड-** बिल्डर संजय बियाणी यांच्या राज्यभर गाजलेल्या हत्येचा अखेर पोलिसांनी छडा लावला आहे. याप्रकरणी पोलिसांनी नांदेडमधीलच सहा जणांना अटक केली आहे. बियाणी यांची हत्या खंडणीसाठीच करण्यात आल्याचे उघडकीस आले असून यात रिंदा गँगचा सहभाग असल्याचेही पुढे आले आहे. या हत्येच्या तपासासाठी पोलिसांनी महाराष्ट्रासह इतर सहा राज्यात जाऊन तपास करून या हत्येचा छडा लावला आहे.

नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी यांनी आज येथे पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी नांदेडचे पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक तथा एसआयटीचे प्रमुख विजय कबाडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकदास चिखलीकर यांच्यासह अनेक पोलीस अधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिती होती.

नांदेडमधील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांची ५ एप्रिल रोजी हत्या करण्यात आली. संजय बियाणी यांच्या शारदा नगर येथील त्यांच्या निवासस्थानाबाहेर त्यांच्या मागावर असलेल्या दोन आरोपींनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. **(पान ६ वर...)**

## आरोपींना दहा दिवस पोलीस कोठडी



संबंध राज्यभर तीव्र पडसाद उमटलेल्या बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांच्या खून प्रकरणाला वाचा फुटली. पोलिसांच्या अथक परिश्रमानंतर अखेर संजय बियाणीचे मारेकरी गजाआड झाले. चोख पोलिस बंदोबस्तात बुधवार दि. १ जून रोजी सकाळी सहा जणांना न्यायालयासमोर हंजर केले असता न्यायाधीश बी. एम. देशमुख यांनी त्यांना दहा दिवस पोलीस कोठडी ठोठावली आहे.